# ज्येष्ठ नागरिकांसाठी सायबर जनजागृती

▶ **भुसावळ (वा.)** सध्याच्या आधुनिक व डिजिटल युगात ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करून होणाऱ्या सायबर फसवणुकीचे प्रमाण चिंतेचा विषय ठरत आहे. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांना डिजिटल तंत्रज्ञानाची ओळख करून देत ऑनलाइन फसवणुकीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी रेणुकामाता ज्येष्ठ नागरिक मंडळ, कुऱ्हे (पानाचे) येथे विशेष सायबर सुरक्षा मार्गदर्शन सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जीवन विद्या मिशन (मलकापूर) च्या अध्यक्षा शैलजा टेकडे व नेते कालिदास सखाराम कळस्कर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी उपक्रमाचे कौतुक करत डिजिटल युगात ज्येष्ठ नागरिकांनी कोणती खबरदारी बाळगावी, याबाबत मार्गदर्शन केले. सत्रादरम्यान ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध सायबर धोक्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने बँक अथवा पेन्शन अधिकारी असल्याचे भासवून येणारे फसवणुकीचे कॉल्स, ओटीपी व डिजिटल केवायसी अपडेट फ्रॉड, व्हॉट्सअॅप आणि एसएमएसवर येणाऱ्या संशयास्पद लिंक्स तसेच ऑनलाइन आर्थिक व्यवहार करताना घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.



कोणतीही बँक किंवा शासकीय संस्था फोनवर ओटीपी अथवा गोपनीय माहिती मागत नाही, त्यामुळे आपली वैयक्तिक व आर्थिक माहिती कोणाशीही शेअर करू नये असे आवाहन करत फसवणूक झाल्यास तातडीने सायबर हेल्पलाइन नंबर १९३० वर संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात आले. या जनजागृती उपक्रमाचे यशस्वी आयोजन स्वयंसेवक अक्षय पाटील, लोकेश पाटील, तनिषा महाजन आणि तेजस्वीनी पाटील यांनी केले. त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत उदाहरणे देऊन ज्येष्ठ नागरिकांच्या शंकांचे निरसन केले. कार्यक्रमास मंडळाचे पदाधिकारी व परिसरातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.